वृत्तपत्राचे नांव - अग्रणी वार्ता
दिनांक - 23/9/2016

## सोलापूर विदयापीठात मानवी हक्कांबाबत कार्यशाळेचे उदघाटन

# विश्वबंधुत्वाचा विचार जोपासा - न्या. बन्नूरमठ

सोलापूर - जागतिकीकरणाच्या आजच्या कालखंडात अधिकांधिक संकुचित व स्वकेंद्रित विचार करीत आहेत.मानवतेवरील आपला विश्वास दृढ करुन, विश्वबंधुत्वाचा विचार जोपासत इतरांच्याही मानवी हक्कांची जपणूक आपण केली पाहिजे असे आवाहन् महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती एस.आर. बन्नूरमठ ( सेवानिवृत्त न्यायमूर्ती केरळ उच्च न्यायालय) यांनी केले.

सोलापूर विदयापीठातील सामाजिक शास्त्रे संकुलाच्या वतीने विदयापीठाच्या मुख्य सभागृहात दिनांक २२ व २३ सप्टेंबर २०१६ हे दोन दिवस 'हयूमन राईटस एण्ड हयूमनायजिंग सोसायटीज' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळेचे उदघाटन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सोलापूर विदयापीठाचे कुलगुरु प्रा एन.एन. मालदार होते. याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य एम.ए.सईद (सेवानिवृत्त प्रधान सचिव विधी व न्याय विभाग ) व भगवंतराव मोरे ( आय.पी.एस.), कुलसचिव डॉ. देबेंद्रनाथ मिश्रा, सामाजिक शास्त्र संकुलाचे संचालक प्रा. ई.एन. अशोककुमार, चर्चासत्राचे समन्वयक डॉ. माया पाटील व डॉ.प्रकाश व्हनकडे उपस्थित होते. सभागृहात हैदराबादच्या केंद्रीय विदयापीठातील प्रा. शिवा प्रसाद व प्रा. सुधीर जेकब जॉर्ज, गोवा विदयापीठातील राज्यशास्त्र विभागातील डॉ. बद्रुद्दिन, म्हैसूर विदयापीठातील राज्यशास्त्र विभागाचे प्रा. मुजफ्फर असादी, राष्ट्रीय भटके विमुक्त आयोगाचे माजी अध्यक्ष बाळकृष्ण रेणके या चर्चासत्रातील वक्त्यांसह बी.सी.यु.डी.चे संचालक प्राचार्य आर. वाय. पाटील, विविध संकुलांचे संचालक, अध्यापक, विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

न्यायमूर्ती बन्नूरमठ यांनी आपल्या भाषणात सांगितले की २०१३ पासून राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना झाली आहे व अनेकांना न्याय मिळवून देता आला याचे आम्हाला समाधान आहे. सार्वजनिक प्राधिकरणात कार्य करणा-या व्यक्ती मानवी हक्क उल्लंघनाच्या तक्रारींबाबत योग्य कार्यवाही करीत नसतील तर अशा व्यक्ती व प्राधिकरणावर कारवाई करुन सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्याचे काम



आम्ही करतो. आयोगाकडे आलेल्या प्रकरणे निकाली काढताना आम्ही अर्जदाराकडून कोणतेही शुल्क आकारत नाही. मानवी हक्कांचे उल्लंघन कोठे होत असेल तर कोणीही यासंदर्भात आयोगाकडे याची माहिती देऊ शकते. गरज पडल्यास आयोग स्वतः होऊन काही प्रकरणात करवाई करु शकतो.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु प्रा. एन.एन. मालदार म्हाले की, आपण आपल्या हक्कांबाबत जेवढे जागरुक असतो तेवढाच इतरांच्याही मानवी हक्कांचा विचार करुन, त्यानुसार आपल्या वागणुकीत बदल केले पाहिजेत.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन चर्चासत्राचे उदघाटन् करण्यात आले. सामाजिक शास्त्र संकुलाचे संचालक प्रा. ई.एन. अशोककुमार यांनी प्रास्ताविकात या राष्ट्रीय चर्चासत्राच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. डॉ. माया पाटील यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करुन दिला, डॉ.प्रकाश व्हनकडे आभार प्रदर्शन केले.

महाराष्ट्र उदघाटनानंतरच्या पहिल्या सत्रात महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य एम.ए.सईद म्हणाले की, मानवी हक्क हे प्रत्येकाला जन्मतःच प्राप्त होणारे हक्क आहेत व हे कोणालाही हिरावून घेता येणार नाहीत असे हक्क आहेत. शिक्षण हे मानवी हक्कांची जाणीव करुन देणारे महत्वाचे साधन आहे.मानवी हक्कांबाबत अलिकडच्या काळात चांगले कार्य झाले आहे. मानवी हक्कांबाबत आणखी महत्वपूर्ण कार्य होण्यासाठी लोकांनी खुल्या मनाने विचार करण्याची तसेच मानवी हक्कांची जपणूक करण्याची गरज आहे.

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य भगवंतराव मोरे म्हणाले की सोलापूर विदयापीठाने अतिशय चांगल्या प्रकारे या राष्ट्रीय चार्चासत्राचे आयोजन केले आहे. खूप कमी विदयार्थ्यांना उच्च शिक्षणाची तसेच अशा प्रकारच्या चर्चासत्रात सहभागी होण्याची संधी मिळते. विदयार्थ्यांनी जास्तीत जास्त ज्ञान प्राप्त करावे. ता पुढे म्हाले की राज्य मानवी हक्क आयोग प्रसंगी तपास करुनही कारवाई करतो.काहीजण खोटे दस्तावेज तयार करुन मानवी हक्काच्या क्षेत्रात कार्यकरतो असे भासवून गैरवापर करतात , त्यांच्यावर कारवाई करणार आहोत.

या कार्यशाळेच्या दुपारच्या सत्रात मुजफ्फर असादी यांचे व्याख्यान झाले. २३ सप्टेंबररोजी हैदराबादच्या केंद्रीय विदयापीठातील प्रा. शिवा प्रसाद व प्रा. सुधीर जेकब जॉर्ज, गोवा विदयापीठातील राज्यशास्त्र विभागातील डॉ. बद्रुद्दिन, राष्ट्रीय भटके विमुक्त आयोगाचे माजी अध्यक्ष बाळकृष्ण रेणके आदींची व्याख्याने होणार आहेत